# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६२१२२८
२५६२१२२९
ई–मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे–४११००७.

**संदर्भ** : साफुपुवि/निववि/२४१ **दिनांक** :०६ ऑगस्ट, २०२६

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय** : शैक्षणिक वर्ष २०२६–२०२७ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत योजना क्र. ०६२६२७ 'On The Job Training–इंटर्नशिप कार्यशाळा अर्थसहाय्य योजना' या उपक्रमाअंतर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणेबाबत.

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत, योजना क्र. ०६२६२७ 'On The Job Training – इंटर्नशिप कार्यशाळा अर्थसहाय्य योजना' या उपक्रमाअंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत असून सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी **गुरूवार, दिनांक ०६/०८/२०२६ ते गुरूवार, दिनांक २०/०८/२०२६** असा राहणार आहे.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे –

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—College Login & Password—Planning and Development**

सदर उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही. **(प्रस्तावाची छापील प्रत जमा करण्याची आवश्यकता नाही.)** मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल बंधनकारक राहतील. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

06/08/2026

(सतिश गडदरे)
सहायक कुलसचिव

सोबत : १) योजना क्र. ०६२६२७ (पान क्र. १ ते २)
२) योजना क्र. ०६२६२७ ची नियमावली (पान क्र. १ ते २)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रम २०२६—२७

## योजना क्रमांक : ०६२६२७

## योजनेचे नाव : On The Job Training—इंटर्नशिप कार्यशाळा अर्थसहाय्य योजना

**प्रस्तावना**

NEP 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दिशेने, संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कार्यानुभव (Internship) व ऑन-द-जॉब-ट्रेनिंग संदर्भात जागरूकता व संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत, कार्यशाळा आयोजित करण्यासाठी अर्थसहाय्य देण्याचे निश्चित केले आहे. यामध्ये स्थानिक उद्योग प्रमुखांना आंमत्रित करण्यात यावे. सदरील कार्यशाळा उद्योगांची संघटना/एमआयडीसी/स्थानिक उद्योग असोसिएशन अशा संस्थांच्या सहकार्याने घेण्यात यावी. उद्योगांच्या प्रतिनिधींना विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याच्या दृष्टीने एका मोठ्या सभागृहामध्ये सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे. सदर योजनेअंतर्गत जास्तीत जास्त रक्कम रूपये ३०,०००/— (तीस हजार रूपये) इतके अर्थसहाय्य देण्यात येणार आहे.

**कार्यशाळेची उद्दिष्टे व रूपरेषा :**

१) इंटर्नशिप आणि ऑन—द—जॉब—ट्रेनिंग (OJT) संदर्भात जागरूकता निर्माण करणे.

२) रोजगारक्षमतेसाठी या इंटर्नशिप आणि ऑन—द—जॉब—ट्रेनिंग (OJT) ची गरज आणि महत्त्व स्पष्ट करणे.

३) स्थानिक उद्योग, एसएमई, सरकारी कार्यालये, एनजीओ इत्यादींशी कनेक्ट होणे.

४) किमान विद्यार्थ्यांची उपस्थिती : १०० विद्यार्थी

५) सदर कार्यशाळेची सुरूवात विद्यापीठ गीताने करण्यात यावी.

विद्यापीठ गीत खालील लिंकवर उपलब्ध आहे.

**www.unipune.ac.in—Home page—Planning and Development—Circular For Colleges**

६) कार्यशाळेचे स्वरूप व कालावधी :

अ) कार्यशाळेचे उद्घाटन — १०—१५ मिनिटे

ब) ४५ मिनिटांचे प्रत्येकी दोन सत्रे

क) कार्यशाळा समारोप — १०—१५ मिनिटे

७) या योजनेसाठी विद्यापीठाकडून मिळणारे अनुदान :

| अ. क्र. | विषय | सहभागी उद्योजक/ कंपन्यांची संख्या | विद्यापीठाकडून देण्यात येणारे अर्थसहाय्य |
|---|---|---|---|
| १ | इंटर्नशिप आणि ऑन—द—जॉब— ट्रेनिंग (OJT) | कमीत कमी २५ | रू. २०,०००/— |
| २ | | कमीत कमी ५० | रू. ३०,०००/— |

८) ज्या महाविद्यालये/परिसंस्थेमध्ये विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक आहेत अशा महाविद्यालयांना या योजनेसाठी प्रस्ताव सादर करता येतील.

पान क्र. १/२

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन व विकास पुणे-०७

९) कोणताही सत्कार/स्वागत करण्यासाठी मोमेंटो/पुष्पगुच्छ देण्यात येऊ नये. (आवश्यकता भासल्यास पुस्तक/वृक्षाचे रोप देऊन स्वागत करण्यात यावे.)

१०) व्यासपीठावरील बॅनरवर **'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत'** असा उल्लेख सुरूवातीला असणे आवश्यक आहे.

११) कार्यशाळेचे आयोजन केलेले ६X४ आकाराचे सुस्पष्ट फोटो (फोटोवर दिनांक व वेळ दिसेल असे) जोडावेत. सदर फोटोपैकी एक फोटो स्टेजवरील मान्यवर व बॅनरसह असावा व एक समोरील सहभागी व्यक्तींचा समुह फोटो असावा.

१२) सदर कार्यशाळेचे आयोजन मंजुरी दिनांकापासून ९० दिवसांच्या आत करणे आवश्यक आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन व विकास पुणे-७

2/2

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार कार्यक्रम २०२६–२७

## योजना क्रमांक : ०६२६२७

**On The Job Training–इंटर्नशिप कार्यशाळा अर्थसहाय्य योजना नियमावली**

१) ज्या महाविद्यालये/परिसंस्थांकडे विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक आहेत अशीच महाविद्यालये/परिसंस्था या योजनेसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यास पात्र राहतील. संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यापीठ मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एका महाविद्यालय/परिसंस्थेतून दुसऱ्या महाविद्यालय/परिसंस्थेत बदली झाली असेल तर संस्थेच्या बदली आदेशाची प्रत तसेच प्राचार्य/संचालक यांची बदली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरून झाली असल्यास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मान्यतापत्र हिशेब सादर करतांना सोबत जोडणे बंधनकारक आहे.

२) ज्या महाविद्यालये/परिसंस्थांनी यापूर्वी विद्यापीठाकडून परीक्षा अथवा अन्यकामी उचल रक्कम घेतली असेल व त्याचे हिशेब विहित वेळेत सादर केलेले असणे आवश्यक आहे. हिशेब/उचल रक्कम प्रलंबित नसल्याबाबतचे प्राचार्यांनी/संचालकांनी दिलेले प्रमाणपत्र हिशेब सादर करतांना सोबत जोडणे आवश्यक आहे.

३) ज्या महाविद्यालये/परिसंस्था यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चालू वर्षाचे संलग्नीकरणाचे शुल्क अदा केले आहे अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

४) नियोजन व विकास विभागाला वार्षिक अहवालाची माहिती जमा केल्याची पोहोच प्रत, त्याचप्रमाणे चालू शैक्षणिक वर्षाची AISHE व MIS ची माहिती भरली असल्याचे प्रमाणपत्र अथवा ना–हरकत प्रमाणपत्र, विद्यापीठ निधी (प्रोरेटा) क्रीडा विभाग, विद्यार्थी विकास मंडळ, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रोरेटा शुल्क भरलेल्या चलनाची छायांकित प्रत इ. हिशेब सादर करतांना सोबत जोडणे आवश्यक आहे.

५) ज्या महाविद्यालय/परिसंस्था यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी चालू वर्षाचे संलग्नीकरणाचे शुल्क अदा केले आहे अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल. सदर चलनाची छायांकीत प्रत हिशेब सादर करतांना सोबत जोडणे आवश्यक आहे.

६) ज्या महाविद्यालय/परिसंस्थेवर विद्यापीठ पातळीवर कोणतीही गंभीर स्वरुपाची कारवाई झालेली नाही किंवा सुरु नाही, अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

७) ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशेब विद्यापीठास वेळेत सादर केलेले आहे, अशाच महाविद्यालयांना/परिसंस्थांनाच या उपक्रमांच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करता येईल.

८) सदर महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडून उचल रकमेअंतर्गत घेतलेल्या रकमेचे सर्व खर्चाचे हिशेब विद्यापीठास वेळेत सादर केलेले असणे आवश्यक आहे.



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नियोजन व विकास

९) ज्या महाविद्यालय/परिसंस्थेने विद्यापीठाकडे महाविद्यालय/परिसंस्था बंद करण्यासाठी अर्ज सादर केला असेल, अशा महाविद्यालय/परिसंस्थेचा गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठीचा प्रस्ताव मंजूर करण्यात येणार नाही. जर अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

१०) गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत प्रस्ताव सादर करताना जर एखाद्या महाविद्यालय/परिसंस्थेने प्रस्तावामध्ये चुकीची, दिशाभूल करणारी अथवा खोटी माहिती सादर केल्यास संबंधित महाविद्यालय/परिसंस्थेस गुणवत्ता सुधार योजनेचा लाभ घेण्यास पुढील तीन वर्ष अपात्र ठरविण्यात येईल.

११) ज्या महाविद्यालयात/परिसंस्थेत प्रथम वर्ष विद्यार्थी संख्या शून्य आहे अशा महाविद्यालय/परिसंस्थाना गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्यासाठी प्रस्ताव सादर करता येणार नाही. अशा महाविद्यालयांनी/परिसंस्थानी या योजनेअंतर्गत कोणताही उपक्रम राबविल्यास त्यांचे हिशेब स्विकारण्यात येणार नाहीत.

१२) विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था जर संबंधित महाविद्यालयाच्या/परिसंस्थेच्या स्वतंत्र अभिमत/खाजगी विद्यापीठाशी (महाविद्यालय/परिसंस्था विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या नावाने अथवा बदलेल्या नावाने) संलग्नीत झाले असेल तर अशा अभिमत/खाजगी विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालय/परिसंस्थेला गुणवत्ता सुधार योजने अंतर्गत प्रस्ताव दाखल करता येणार नाही.

१३) विद्यापीठाने अर्थसहाय्य मंजूरीची यादी जाहीर केलेल्या दिनांकानंतर महाविद्यालय/परिसंस्थेमध्ये सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात यावे.

१४) गुणवत्ता सुधार योजनेसाठीचे अनुदानाबाबतचे निर्णय हे संबधित अर्थशिर्षात शिल्लक असलेल्या रकमेच्या अधिन राहून घेतले जातील.

१५) कोणताही प्रस्ताव मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राखीव असतील.

१६) सदर उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे –

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—College Login & Password—Planning and Development**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
नियोजन व विकास
पुणे-७